दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ३० ✻ जालना ✻ ✻ सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# भारतीय संस्कृतीची परंपरा ही जगाला मार्गदर्शक : आ. बबनराव लोणीकर

## परतूरमध्ये रक्षाबंधन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद ✻ पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या 'मन की बात'चे थेट प्रक्षेपण ✻ आ.लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत माता-भगिनींचा स्नेहमेळावा

परतूर, दि. ३० : रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त भाजपा नेते तथा माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत परतूर शहरातील सन्मित्र कॉलनी येथील 'स्नेह निवास' येथे रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास परतूर तालुक्यातील माता-भगिनी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्यातील प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि संरक्षणाची भावना दृढ करणारा सण आहे. याच भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहसोहळ्यात माता-भगिनींशी आपुलकीचा संवाद साधत रक्षाबंधनाचा आनंद साजरा करण्यात आला. कार्यक्रमस्थळी सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध भागांतून महिला भगिनी मोठ्या संख्येने कार्यक्रमस्थळी दाखल झाल्या होत्या. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित माता-भगिनींना रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सवांना केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले. हिंदू धर्मातील विविध सण आणि परंपरा समाजाला एकत्र आणण्याचे, परस्परांमध्ये प्रेम व आपुलकी वाढविण्याचे काम करतात. रक्षाबंधन हा त्याच बंधुभावाचा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संदेश देणारा सण असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, रक्षाबंधन सोहळ्यासोबतच देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमाचे सकाळी ११ वाजता थेट प्रक्षेपण करण्यात आले. कार्यक्रमस्थळी उपस्थित भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि माता-भगिनींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार मनोभावे ऐकले. देशाच्या विकासासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती तसेच देशवासीयांना प्रेरणा देणारे विचार 'मन की बात'च्या माध्यमातून ऐकण्याची संधी



उपस्थितांना मिळाली. रक्षाबंधन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून समाजातील महिला भगिनींप्रती आदर, स्नेह आणि आपुलकी व्यक्त करण्यात आली. सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे आणि सामाजिक सलोखा मजबूत करण्याचे कार्य व्हावे, हा कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश होता. आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणातून भारतीय संस्कृती आणि हिंदू परंपरांचे महत्त्व अधोरेखित करत नव्या पिढीने आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृतीची परंपरा ही जगाला मार्गदर्शन करणारी असून आपल्या सण-उत्सवांमागील सामाजिक संदेश समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने माता-भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि कार्यक्रमातील उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात स्नेहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित महिला भगिनींनीही कार्यक्रमाचे कौतुक करत अशा प्रकारच्या स्नेहमेळाव्यामुळे सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ होतात, अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमास भाजपा पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला पदाधिकारी तसेच परतूर तालुक्यातील माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित या स्नेहसोहळ्याने





परतूरमध्ये सामाजिक एकता आणि बंधुभावाचा संदेश दिला. या प्रसंगी मंदाताई बबनराव लोणीकर, परतूर नगराध्यक्षा प्रियंका शहाजी राक्षे, छाया घोरबांड, वंदना इंगळे यांच्या सह हजारो महिला भगिनी उपस्थित होत्या. तर भाजपाचे परतूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, भाजपा युवा मोर्चा चे जालना जिल्हा अध्यक्ष संपतराव टकले, रमेश भापकर, तुकाराम सोळंके, रवी सोळंके. बाबा तेलगड, संदीप दाभाडे, सुरेश जगताप, बाबाराव थोरात, श्री सर् गांजाळे, शहाजी राक्षे, नितीन जोगदंड यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## मोफत शिक्षण, स्पर्धा परीक्षा केंद्रे, स्वतंत्र वसतिगृहांसह विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न; गांधी चमन येथे दीपक रणनवरे यांचे उपोषण

जालना : ब्राह्मण समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत संपूर्ण ब्राह्मण समाजाच्या वतीने जालना शहरातील गांधी चमन येथे आज आमरण उपोषण सुरू करण्यात आले. उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनातून शासनाने समाजाच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ब्राह्मण समाजातील मुला-मुलींसाठी सर्व शिक्षण मोफत करावे, तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची योग्य तयारी करता यावी यासाठी विभागीय स्तरावर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू करावीत, ही प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे. याशिवाय ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांसाठी



प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र वसतिगृह सुरू करावे, अशीही मागणी करण्यात आली.

तसेच, एथड अंतर्गत सध्या असलेली आठ लाख रुपयांची उत्पन्न मर्यादा वाढवून १५ लाख रुपये करावी, अशी मागणीही आंदोलकांनी केली आहे. ब्राह्मण समाजावर होणारी कथित बदनामी आणि अन्यायकारक टीका रोखण्यासाठी ब्राह्मण समाजाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणीदेखील यावेळी पुढे करण्यात आली.

दरम्यान, या मागण्यांसाठी तिसऱ्यांदा उपोषणाला बसण्याची वेळ आली असल्याचे आंदोलकांनी सांगितले. शासनाकडे अनेक वेळा मागण्या मांडूनही त्यावर ठोस निर्णय घेतला जात नसल्याने समाजामध्ये नाराजी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपोषणकर्ते दीपक रणनवरे यांनी शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ब्राह्मण समाजाच्या मागण्यांकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. अनेक वेळा मागण्या मांडूनही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने तिसऱ्यांदा उपोषणाला बसण्याची वेळ आली आहे, असा आरोप त्यांनी केला.

तसेच, ब्राह्मण समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने लवकरात लवकर (पान ३ वर)

## राहत सोशल ग्रुप जालना तर्फे २९ नोव्हेंबर रोजी मुस्लिम सामूहिक विवाहसोहळ्याचे आयोजन

**पालकांनी १५ नोव्हेंबरपूर्वी मुला-मुलींची नावे नोंदवावीत. शेख अफसर शेख जी, अध्यक्ष, राहत सोशल ग्रुप जालना**

जालना ३०/ ऑगस्ट २०२६ (लियाकत अली खान यासिर, जालनावी जालना यांच्यामार्फत) या वर्षीही, राहत सोशल ग्रुप जालना तर्फे २५ व्या मुस्लिम सामूहिक विवाहसोहळ्याचे आयोजन रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता, कदिम जालना येथील उर्दू हायस्कूलमागील आयेशा लान्स येथे करण्यात येत आहे. इच्छुक पालकांनी १५ नोव्हेंबर २०२६ पूर्वी राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी - ०९४२२२१८२२०, संस्थापक सचिव लियाकत अली खान यासिर जालनावी - ०९४२२७२४२५७, उपाध्यक्ष शेख सलीम शेख मुहम्मद - ०९४२२७३७००२, न्यू भारत



ट्रेडर्स, पेट्रोल पंपासमोर, संत गाडगेबाबा बाबा कॉम्प्लेक्स, बस स्टँड रोड, जालना येथील इतर अधिकारी आणि कार्यकर्त्यांकडे आपली नावे नोंदवावीत: असे आवाहन राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी यांनी केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मुस्लिम सामूहिक विवाहांमध्ये नोंदणीसाठी मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे असल्याचे प्रमाणित प्रमाणपत्र आणि कागदपत्रे अनिवार्य आहेत. हे लक्षात घ्यावे की, राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून जालना जिल्ह्यात यशस्वीपणे मुस्लिम सामूहिक विवाह आयोजित करत आहे आणि आतापर्यंत सहाशेहून अधिक मुस्लिम जोडप्यांचे विवाह झाले आहेत. या वर्षीही, राहत सोशल ग्रुप जालना यांच्या वतीने मुस्लिम सामूहिक विवाह आयोजित केले जात आहेत. या प्रसंगी, राहत सोशल ग्रुप जालना तर्फे नवविवाहित जोडप्याला पलंग, अंथरूण-पांघरूण, भांडी बरतन आणि दैनंदिन गरजेच्या जिवनोपयोगी वस्तू दिल्या जातील. त्यामुळे, सर्व इच्छुक पालकांनी १५ नोव्हेंबरपूर्वी लवकरात लवकर राहत सोशल ग्रुप जालना यांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून आपल्या मुला-मुलींची नावे नोंदवावीत.

## युवकांच्या हातात मोबाईल नव्हे, देश घडविण्याची ताकद हवी : डॉ. रामेश्वर पाटील

**बदनापूर/ प्रतिनिधी(नवनाथ गव्हाणे)**

रोशनगाव : छत्रपती हॉस्पिटलचे संचालक डॉ. रामेश्वर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मित्र मंडळ, रोशनगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'युवा संवाद' हा अभिनव उपक्रम उत्साहात संपन्न झाला. माऊली मंदिर चौक, रोशनगाव येथे झालेल्या या कार्यक्रमात युवकांच्या विविध प्रश्नांवर मोकळेपणाने संवाद साधत सामाजिक बांधिलकी, व्यसनमुक्ती, देशसेवा आणि युवकांच्या उज्ज्वल भवितव्यावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी युवकांना मार्गदर्शन करताना डॉ. रामेश्वर पाटील म्हणाले की, युवकांच्या



हातात केवळ मोबाईल नव्हे, तर देश घडविण्याची ताकद असली पाहिजे. आजची तरुणाई मोबाईलच्या आभासी दुनियेत अडकत चालंली असून, युवकांनी आपली ऊर्जा विधायक कार्यासाठी खर्च करणे गरजेचे आहे.

मोबाईलमध्ये गोळ्या मारण्यापेक्षा सीमेवर जाऊन गोळ्या मारा, असे आवाहन करत त्यांनी युवकांनी मोबाईलच्या आहारी न जाता देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द बाळगावी, असे सांगितले. युवकांनी आपली ताकद, बुद्धी आणि ऊर्जा देशसेवा व समाजसेवेसाठी वापरली, तर समाजात मोठे परिवर्तन घडू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपण जीवन जगत असताना स्वतःला हुशार समजत असू, तर आपल्या अवतीभोवती असणाऱ्या व्यक्तींनाही व्यसनापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असा (पान ३ वर)





गणपती विसर्जन ज्या ठिकाणी होते ते कुंड पाण्याने गच्च भरलेले असून कोणत्याच प्रकारची सेक्युरिटी नाही व शिशुभिकरणाचे कामअर्धवट दिसून येत आहे गणपती अवघ्या बारा तेरा दिवसावर येऊन ठेवले असून याकडे जालना महानगरपालिकेचे दुर्लक्ष दिसून येत आहे. **छायाचित्र किरण खानापुरे**

## कचरा नाही, कला आहे! पानाफुलांची किमया आहे! टाकाऊ वस्तूंपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या आकर्षक राख्या

**नवनाथ गव्हाणे दै. धर्मयोद्धा / प्रतिनिधी** : रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर गुरूकुलम् शिशुवाटीका, बदनापूर येथे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक राख्या तयार करण्याचा अनोखा उपक्रम घेण्यात आला. झाडांची पाने-फुले, धागे-दोरे तसेच कागद, पेन्सिलचा कचरा यांसारख्या टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून विद्यार्थ्यांनी आकर्षक राख्या तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले. प्लास्टिकच्या वस्तू सहजपणे नष्ट होत नसल्याने पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, तसेच 'टाकाऊपासून





**पानाफुलांपासून राख्या तयार केल्यामुळे विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व समजते आणि पर्यावरणाविषयी जिव्हाळा निर्माण होतो. तसेच कागद, पेन्सिलचा कचरा यांसारख्या टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून टिकाऊ वस्तू निर्माण करता येतात, हा संदेश विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळतो. स्वतः राखी तयार केल्यामुळे त्यांचा खर्चही वाचतो आणि त्यांच्या कल्पकतेला वाव देत नवीन काहीतरी शिकण्याची संधी मिळते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची संस्कारक्षम भावना रुजते.**

टिकाऊ' या संकल्पनेची ओळख व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी पानाफुलांपासून तसेच उपलब्ध टाकाऊ साहित्यापासून विविध रंगांच्या व आकर्षक राख्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच त्यांना पर्यावरणपूरक वस्तू तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. बाजारातून राख्या खरेदी करण्याऐवजी स्वतःच्या हाताने राखी तयार करण्याचा आनंदही विद्यार्थ्यांनी अनुभवला.

# संपादकीय

## मानसिक भार आर्थिक ताण

आशिया–पॅसिफिक क्षेत्रातील भू–राजकीय नकाशावर तैवानची स्थिती नेहमीच एका धुमसत्या ज्वालामुखीसारखी राहिली आहे. चीनने तैवानला आपल्या मुख्य भूमीचा भाग मानणे आणि तैवानने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडणे, हा संघर्ष नवा नाही; मात्र अलीकडच्या काळात या संघर्षाचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. पारंपरिक युद्धाच्या तोफा डागण्याऐवजी किंवा क्षेपणास्त्रांची थेट धमकी देण्याऐवजी चीनने आता एका अत्यंत छुप्या, चाणाक्ष आणि दीर्घकालीन रणनीतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. या रणनीतीचे ताजे आणि अत्यंत चिंताजनक उदाहरण म्हणजे चीनने तैवानच्या पूर्व किनारपट्टीवर अचानक वाढवलेली सागरी सुरक्षा दलाची गस्त. एकाच महिन्यात दुसऱ्यांदा चीनच्या कोस्ट गार्डने तैवानच्या अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या पूर्व किनारपट्टीवर कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या नावाखाली शक्तिप्रदर्शन केले. वरकरणी ही केवळ नियमित सागरी गस्त वाटू शकते; परंतु जागतिक संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हा चीनच्या ‘ग्रे–झोन वॉरफेयर’चा (धुसर क्षेत्रातील युद्धनीती) एक अत्यंत धोकादायक टप्पा आहे. यात सर्वात मोठा प्रश्न हा निर्माण होतो, की जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शक्तिशाली नौदल पाठीशी असताना चीनने तैवानला घेरण्यासाठी आपल्या ‘कोस्ट गार्ड’ला समोर का केले आहे? यामागे ड्रॅगनची नेमकी कोणती नवी चाल आहे आणि यामुळे आशियातील सुरक्षेचे समीकरण कसे बदलणार आहे, याचा सखोल वेध घेणे गरजेचे आहे. चीन आणि तैवानमधील संघर्षाचा अभ्यास करताना भौगोलिक रचनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. तैवानच्या पश्चिमेला ‘तैवान स्ट्रेट’ (डीरळीं) आहे, जी चीनच्या मुख्य भूमीला लागून आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, चीनकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य हल्ल्याचा किंवा घुसखोरीचा धोका हा याच पश्चिम किनारपट्टीला राहिला आहे. साहजिकच, तैवानने आपली बहुतांश लष्करी सज्जता, क्षेपणास्त्र यंत्रणा आणि संरक्षण तटबंदी याच भागात केंद्रित केली आहे. याउलट तैवानची पूर्व किनारपट्टी थेट प्रशांत महासागराकडे उघडते. भौगोलिकदृष्ट्या हा भाग उंच कडे–कपाऱ्यांनी आणि डोंगराळ भूभागाने वेढलेला आहे. त्यामुळे चिनी नौदलाला थेट पूर्व किनाऱ्यावरून तैवानमध्ये प्रवेश करणे नेहमीच कठीण जाणार आहे. आजवर तैवानी लष्करासाठी हा पूर्व किनारा एका सुरक्षित पनाहगाहासारखा राहिला आहे. युद्धजन्य परिस्थितीत तैवानचे नौदलाचे तळ, लढाऊ विमाने आणि लष्करी रसद सुरक्षित ठेवण्यासाठी याच पूर्व किनारपट्टीचा वापर केला जातो; परंतु चीनने आता नेमक्या याच ‘सुरक्षित क्षेत्रा’कडे आपली नजर वळवली आहे. पूर्व किनारपट्टीवर ‘कोस्ट गार्ड’ची गस्त वाढवून चीनने तैवानला एक स्पष्ट संदेश दिला आहे, की आता त्याच्यासाठी कोणताही कोपरा सुरक्षित राहिलेला नाही. चीन तैवानला केवळ पश्चिमेकडूनच नव्हे, तर पूर्वेकडूनही वेढून पूर्ण नाकेबंदी करण्याचा सराव करत आहे. भविष्यात चीनने तैवानवर थेट लष्करी कारवाई केली, तर पूर्व किनारपट्टीवरूनच अमेरिका, जपान किंवा अन्य पाश्चात्त्य मित्रदेशांकडून तैवानला मदत मिळण्याची सर्वाधिक शक्यता आहे. त्यामुळे या पूर्व किनाऱ्यावर आत्तापासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित करून, संकटसमयी आंतरराष्ट्रीय मदतीचा मार्ग पूर्णपणे रोखून धरण्याची चीनची ही दीर्घकालीन योजना आहे. चीनने नौदलाच्या विनाशकारी युद्धनौका पाठवण्याऐवजी पांढऱ्या रंगाची, नागरी प्रशासनाशी साधर्म्य सांगणारी ‘कोस्ट गार्ड’ची (उेरीीं र्ीरीव)जहाजे का पाठवली, याचे उत्तर ‘ग्रे–झोन वॉरफेयर’ या संकल्पनेत दडले आहे. लष्करी मुत्सद्देगिरीमध्ये ही अशी स्थिती असते, जी पूर्णपणे शांतताही नसते आणि उघड युद्धही नसते. पांढरा रंग म्हणजे शांतता आणि काळा रंग म्हणजे उघड युद्ध असे मानल्यास, या दोन्हीच्या मधला जो धुसर भाग असतो, त्याला ‘ग्रे–झोन’ म्हटले जाते. थोडक्यात सांगायचे, तर शत्रूवर एकही गोळी न झाडता, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे थेट उल्लंघन न करता, समोरच्या देशाला मानसिक आणि रणनीतिकदृष्ट्या इतके थकवून सोडायचे की त्याने शेवटी स्वतःहून गुडघे टेकावेत. हीच ही रणनीती आहे. कोस्ट गार्ड हे अधिकृतपणे लष्कर किंवा नौदलाचा भाग मानले जात नाही, तर सागरी हद्दीतील तस्करी रोखणारे आणि कायद्याचे पालन करून घेणारे नागरी किंवा निमलष्करी बल असते. चीन आपल्या ‘कोस्ट गार्ड’ला तैवानच्या हद्दीत पाठवतो, तेव्हा जगाला दाखवतो, की आम्ही कोणतेही युद्ध करत नसून आमच्याच एका प्रांतात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गस्त घालत आहोत. चीनची ही चलाखी आंतरराष्ट्रीय समुदाय आणि विशेषतः अमेरिकेला कोंडीत पकडणारी ठरते. संयुक्त राष्ट्रांच्या नियमांनुसार, कोणताही देश आपल्या संरक्षणासाठी किंवा मित्रदेशाच्या मदतीसाठी थेट लष्करी हस्तक्षेप तेव्हाच करू शकतो, जेव्हा त्याच्यावर ‘सशस्त्र लष्करी हल्ला’ झाला असेल. आता चीनने युद्धनौका न पाठवता केवळ ‘कोस्ट गार्ड’ पाठवले असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा लष्करी हल्ला ठरत नाही. परिणामी, अमेरिकेसारख्या महाशक्तीलाही तैवानच्या मदतीसाठी थेट आपली नौदल जहाजे पाठवणे कायदेशीर आणि कूटनीतिकदृष्ट्या अवघड होऊन बसते. चीन नेमक्या याच कायदेशीर पळवाटेचा गैरफायदा घेत आहे. या ‘ग्रे–झोन’ रणनीती अंतर्गत चीन एकाच वेळी अनेक पातळ्यांवर तैवानवर दबाव आणत आहे. ज्याप्रमाणे सॅलडच्या रूपात बारीक बारीक तुकडे केले जातात, त्याचप्रमाणे चीन तैवानच्या सागरी हद्दीचे आणि संप्रभुतेचे हळूहळू लहान लहान तुकड्यांमध्ये हरण करत आहे. चीन एकदम मोठा हल्ला करत नाही, कारण त्याला माहीत आहे, की मोठ्या हल्ल्याला तीव्र जागतिक विरोध होईल. त्याऐवजी तो दर महिन्याला आपली जहाजे काही किलोमीटर आत पाठवतो, तिथे काही काळ मुक्काम ठोकतो आणि नवीन सीमा रेषा तयार करतो. काही काळाने घुसखोरी करून ताब्यात घेतलेली तीच जागा अधिकृत मानली जाऊ लागते. या पद्धतीमुळे तैवानला दरवेळी नेमकी काय प्रतिक्रिया द्यावी, हे समजत नाही. चीन तैवानविरुद्ध केवळ ’कोस्ट गार्ड’च नव्हे, तर प्रशिक्षित निमलष्करी जवान असलेल्या व्यावसायिक मासेमारी नौकांचाही वापर करतो. या नौका तैवानच्या बेटांभोवती वेढा घालून दबाव निर्माण करतात. तैवानने कारवाई केल्यास चीन त्याला निष्पाप मच्छीमारांवरील अन्याय म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडतो. थेट लष्करी हल्ल्याऐवजी जहाजांना धडक देणे, पाण्याच्या प्रबळ फवाऱ्यांचा वापर करणे आणि शक्तिशाली लेझरद्वारे दळणवळणात अडथळे निर्माण करणे अशा ’ग्रे–झोन वॉरफेयर’च्या तंत्रांचा चीन अवलंब करतो. यामुळे तैवानचे नुकसान होते, पण मोठी आंतरराष्ट्रीय लष्करी प्रतिक्रिया टाळली जाते. या वाढत्या दबावाला उत्तर म्हणून तैवानने कठोर भूमिका घेतली आहे. चिनी ’कोस्ट गार्ड’कडून तपासणीची मागणी झाल्यास ती नाकारण्याचे आदेश देण्यात आले असून, बळजबरी झाल्यास नौदलाला आवश्यक कारवाईचे निर्देश आहेत. मात्र सततच्या चिनी गस्तीमुळे तैवानच्या सैन्यावर २४ तास सतर्क राहण्याचा ताण असून, मानसिक थकवा आणि आर्थिक भार वाढत आहे.

# डबल इंजिन सरकार शेतकऱ्यांसह महिला व युवकांच्या पाठीशी खंबीर:उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



परभणी : राज्यातील शेतकऱ्यांसह लाडक्या बहिणी व युवकांच्या पाठीशी केंद्र व राज्यातील हे डबल इंजिन सरकार खंबीरपणे उभे राहील व विकास कामांकरीता निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रविवारी परभणीत आयोजित केलेल्या शेतकरी व युवा संवाद मेळाव्यातून दिली. येथील स्टेडिअम मैदानावर शिवसेनेच्या वतीने रविवारी दुपारी शेतकरी व युवक संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे, राज्याचे वित्त व राज्य मंत्री आशिष जयस्वाल, संयोजक तथा खासदार संजय जाधव, खासदार संजय देशमुख, माजी आमदार शंकरराव धोंडगे, आमदार हिकमतराव उढान, शिवसेनेचे संपर्क प्रमुख आनंद जाधव, आमदार सईद खान, जालना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, परभणी जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हा प्रमुख विशाल कदम, माजी खासदार सुरेश जाधव, माजी आमदार हरिभाऊ लहाने, परभणीचे प्रथम महापौर प्रताप देशमुख, शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख भास्कर लंगोटे, संपर्कप्रमुख राजू कापसे यांच्यासह अन्य मान्यवर व्यासपीठावर विराजमान होते. सरकारच्या तिजोरीवर सर्वसामान्य शेतकर्यांचा पहिला हक्क व अधिकार आहे, असे नमूद करीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महायुती सरकारने आपल्या कारकिर्दीत सातत्याने शेतकरी हिताचेच निर्णय घेतले आहेत. शेतकरी सन्मान योजनेतून राज्य व केंद्रातील डबल इंजिन सरकारने प्रतिवर्षी १२ हजार रुपयांचे अनुदान शेतकर्यांच्या खात्यात जमा केले आहेत. मायबाप शेतकर्यांच्या आपत्तींतसुध्दा हे सरकार शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अलिकडे महायुती सरकारने अहिल्याबाई होळकर कर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या योजनेतूनच परभणी जिल्ह्यात ५०८ कोटी रुपयांची कर्जमाफी झाली आहे, अशी माहिती दिली. राज्य व केंद्रातील सरकार शेतकर्यांना कधीही वार्यावर सोडणार नाही, शेतकर्यांच्या अडी अडचणीत हे सरकार निश्चितपणे शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. महिलांकरीताही या सरकारने बहुतांशी निर्णय घेतले आहेत. त्याद्वारे महिलांचा सन्मान वाढावा या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. लाडकी बहिण सारखी योजना महिलांना सन्मान देणारी ठरली आहे. या लाडक्या बहिणी लखपती व्हाव्यात, या दृष्टीनेही हे सरकार निश्चितपणे प्रयत्न करणार आहे, असे स्पष्ट करतेवेळी शिंदे यांनी महिलांचा आत्मसन्मान राखला जाईल, अशी ग्वाही दिली. राज्यातील युवकांनाही मोठ्या प्रमाणावर कामे मिळावीत या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. विशेषतः युवा शक्तीत मोठी ताकद आहे. युवक कष्टाळू आहेत. या युवकांना संधी मिळाली पाहिजे, ती संधी निश्चितपणे दिली जात आहे. युवकांच्या कौशल्य विकासाकरीता सारे प्रयत्न सुरु आहेत. स्टार्टअप, पॅकेजींग वगैरेसारख्या गोष्टींना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. एआयच्या माध्यमातून भविष्यात युवकांना मोठ्या प्रमाणावर काम मिळणार आहे. युवकांच्या पाठीशी हे सरकार निश्चितच खंबीरपणे उभे राहील, असे ते म्हणाले. युवकांनी चेंजमेकर बनले पाहिजे, बदल घडविले पाहिजे, नोकरीच्या मागे लागण्याऐवजी नोकरी देणारे बनले पाहिजे, असे आवाहनही केले.

विकासाची पर्वणी घेऊन येऊ...

परभणी शहरासह जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. या सर्व प्रश्नांची हे सरकार निश्चितपणे दखल घेऊ लागले आहे. ‘जगात जर्मनी, भारतात परभणी’ या म्हणीप्रमाणे परभणी प्रत्यक्षात साकार व्हावी, या दृष्टीने हे सरकार मोठ्या प्रमाणावर पाऊले उचलील असा विश्वास व्यक्त करतेवेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी परभणी जिल्ह्यातील पायाभूत सुविधांसह विकासाकरीता दीड हजार कोटींच्या योजना आणल्या आहेत. यातून कृषि क्षेत्रातील जोडधंदे, शेतीच्या तंत्रास प्रोत्साहन, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ वगैरेंना प्रोत्साहन दिले जाणार आहे. परभणी महानगरांतर्गत रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा, घनकचरा या प्रकल्पांना सर्वतोपरि निधी दिला जाईल. या व्यतिरिक्त नवीन एमआयडीसीचा प्रश्न तात्काळ मार्गी लावला जाईल, जिल्हा क्रिडा संकुलासाठी जागा उपलब्ध केली जाईल, कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी तात्काळ केली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली

## नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा एका वर्षावर येऊन ठेपला

सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे ही प्राधिकरणामार्फत सुरू आहे. शहरातील विकासकामे मनपा प्रशासनामार्फत केली जात आहेत. परंतु मनपा प्रशासनाकडून सुरू असलेली किंवा प्रस्तावित कामे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कुंभमेळ्याशी संबंधित आहेत. नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा आता अवघ्या एका वर्षावर येऊन ठेपला आहे. सुमारे सात महिन्यांनंतर, २०२६ मध्ये कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होणार असून, त्यानंतर प्रत्यक्ष कुंभपर्वाच्या तयारीला अधिक वेग येणार आहे. अशा महत्त्वाच्या टप्प्यावर शहरातील पायाभूत सुविधा आणि विकासकामे युद्धपातळीवर पूर्ण होणे अपेक्षित आहे. यानंतर पुढील कुंभमेळा उज्जैन येथे होणार असून, तेथील प्रशासनानेही विकासकामांना मोठ्या प्रमाणावर गती दिली आहे. त्या तुलनेत नाशिकमध्ये मात्र दरनिर्धारणाच्या वादामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महापालिका प्रशासनाने लागू केलेल्या ‘स्टार रेट’ प्रणालीत बाजारातील वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्यास त्यानुसार दरांमध्ये बदल करून ठेकेदारांना अतिरिक्त मोबदला मिळण्याची तरतूद असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या प्रणालीमुळे विकासकामांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याउलट, राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा पातळीवरील बहुतांश शासकीय कामे शासनमान्य डीएसआर दरसूचीनुसार केली जातात. या प्रणालीमध्ये सिमेंट, स्टील, वाळू, खडी यांसारख्या बांधकाम साहित्याचे दर शासनाकडून निश्चित केलेले असतात. त्यामुळे ठेकेदारांना मनमानी दर आकारता येत नाहीत. एखाद्या वस्तूच्या बाजारभावात वाढ झाली तरी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसारच देयके अदा केली जातात. परिणामी, सार्वजनिक निधीचा योग्य वापर होतो आणि शासनाच्या खर्चावर नियंत्रण राहते. याच कारणामुळे नाशिक महापालिकेने शासनमान्य डीएसआर प्रणालीचा अवलंब न करता स्वतंत्र ‘स्टार रेट’ प्रणालीचा आग्रह का धरला, असा सवाल सत्ताधारी आणि विरोधक दोघांकडून उपस्थित केला जात आहे. या निर्णयामागील पारदर्शकतेबाबतही अनेकांनी शंका व्यक्त केली आहे. सुमारे दहा ते बारा दिवसांपूर्वी झालेल्या महासभेत या विषयावर मोठा गदारोळ झाला होता. विरोधी पक्षांनी ‘स्टार रेट’च्या मुद्द्यावर प्रशासनाला धारेवर धरत सभागृह दणाणून सोडले होते. त्यानंतर महापौर हिमगौरी आहेर आडके यांनी या विषयावर विशेष महासभा बोलावण्याची घोषणा केली होती. मात्र, बारा दिवस उलटल्यानंतरही विशेष महासभेची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता सत्ताधारी शिवसेनेसह विरोधी पक्षांनीही विशेष महासभा तातडीने बोलावून ‘स्टार रेट’ प्रणालीबाबत स्पष्ट निर्णय घेण्याची मागणी केली आहे. कुंभमेळ्यासारख्या जागतिक स्तरावरील धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विकासकामांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होणे शहराच्या दृष्टीने हितावह नाही.




## तामिळनाडू सरकारचा निर्णय, माजी मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या सुरक्षेत कपात



चेन्नई : तामिळनाडू पोलिसांनी सुरक्षा प्राप्त राजकीय नेत्यांना असलेल्या धोक्याचे वेळोवेळी केलेल्या आकलनानंतर माजी मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांच्या सुरक्षेत कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांची ‘झेड प्लस’ सुरक्षा आता ‘झेड’ श्रेणीत करण्यात आली आहे. राज्य सचिवालयात कोअर सेल सिक्युरिटी विंगने केलेल्या सुरक्षा आढाव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. मुख्य सचिव साई कुमार, गृहसचिव के. मणिवासन, पोलीस महासंचालक महेश कुमार अग्रवाल तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रक्रियेत सहभाग घेतला. यावेळी गुप्तचर माहिती आणि स्टॅलिन यांच्या सुरक्षेच्या गरजांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नव्या सुरक्षा व्यवस्थेनुसार स्टॅलिन यांना मोठ्या प्रमाणावर पोलीस सुरक्षा मिळत राहणार आहे. त्यांच्या ताफ्याच्या पुढे, मध्यभागी आणि मागील बाजूस सुरक्षा पथके तैनात केली जातील. या सुरक्षा व्यवस्थेत पायलट, एस्कॉर्ट, बॅकअप आणि क्लोज प्रोटेक्शन वाहनांचा समावेश असेल. प्रवास तसेच सार्वजनिक कार्यक्रमांच्या वेळी ही वाहने त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळतील. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा बदल सुरक्षा व्यवस्था हटवण्याचा निर्णय नसून सुरक्षेची तैनाती अधिक तर्कसंगत पद्धतीने करण्यासाठी घेण्यात आलेले पाऊल आहे. स्टॅलिन यांच्या सुरक्षेसाठी किती कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, याची माहिती देण्यात आलेली नाही. पुढील सुरक्षा आढावा होईपर्यंत ही नवी व्यवस्था लागू राहणार आहे. मात्र, नवीन गुप्तचर माहिती मिळाल्यास त्याआधीही त्यांच्या सुरक्षेचा आढावा घेतला जाऊ शकतो. तामिळनाडूमध्ये व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या सुरक्षेचा दर सहा महिन्यांनी आढावा घेतला जातो. या प्रक्रियेत गुप्तचर अहवाल, धोक्याचे स्वरूप आणि त्याची तीव्रता, संबंधित व्यक्तीची सार्वजनिक ठिकाणी होणारी उपस्थिती, प्रवासाची पद्धत तसेच सुरक्षेच्या गरजा यांचा विचार केला जातो. समितीच्या अहवालाच्या आधारे संबंधित व्यक्तीची सुरक्षा श्रेणी कायम ठेवली जाऊ शकते, वाढवली जाऊ शकते किंवा कमी केली जाऊ शकते. २०२६ च्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत स्टॅलिन आणि द्रमुकला मोठा पराभव पत्करावा लागल्यानंतर काही महिन्यांनी त्यांच्या सुरक्षेत कपात करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, स्टॅलिन यांच्या सुरक्षेतील हा बदल पूर्णपणे व्यावसायिक पद्धतीने केलेल्या धोक्याच्या आकलनावर आधारित आहे. सुरक्षा प्राप्त व्यक्तींच्या सुरक्षेचा राज्यस्तरीय नियमित आढावा घेण्याच्या प्रक्रियेचाच हा एक भाग आहे. या निर्णयाचा कोणत्याही राजकीय परिस्थितीशी किंवा निवडणुकीच्या निकालाशी संबंध नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# मराठा आंदोलनप्रश्नी मार्ग काढू, मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

नागपूर : मराठा समाजाच्या ज्या मागण्या आहेत त्यातील कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या मागण्यांवर सकारात्मक विचार होईल आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. तर राधाकृष्ण विखे पाटील हे चर्चा करत आहेत आणि एक-दोन दिवसात तोडगा निघेल, असा विश्वास राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला. सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सकारात्मक असल्याची माहिती दत्तात्रय भरणे यांनी दिली. मराठा समाजाला न्याय देतानाच ओबीसी, बहुजन, आदिवासी आणि अन्य सर्व समाजघटकांच्या हक्कांचे संरक्षण करून सर्वसमावेशक विकास साधणे, ही महायुती सरकारची भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीतील शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात सांगितले. मराठा समाजाच्या हितासाठी महायुती सरकारने आतापर्यंत विविध निर्णय घेतले आहेत. ५२०० अधिसंख्य पदांवरील उमेदवारांना नोकरी, न्यायमूर्ती शिंदे समितीमार्फत लाखो नोंदींची तपासणी, कुणबी प्रमाणपत्रांचा मार्ग, १० टक्के आरक्षण, सारथीला ३०० कोटी, अण्णासाहेब पाटील महामंडळाची कर्जमर्यादा १५ लाख रुपये, वसतिगृह व उच्च शिक्षणासाठी मदत, तसेच आंदोलनातील मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये आणि पात्रांना एसटीमध्ये नोकरी हे सर्व निर्णय महायुती सरकारनेच घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. दरम्यान मराठा समाजातील पात्र व्यक्तींना लवकर कुणबी प्रमाणपत्र द्यावे, हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी करावी या मागण्या करत यासाठी मराठा समाजातील प्रतिनिधींनी नव्याने आंदोलन सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या



मागण्यांवर सकारात्मक विचार होईल आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

# ६ चौकार ७ षटकार, अभिषेक शर्माची शेर ए पंजाब टी २० लीगमध्ये तुफान फटकेबाजी, २६ बॉलमध्ये ७७ धावांची खेळी

शेर ए पंजाब लीगला आजपासून सुरुवात झाली आहे. पहिल्याच सामन्यात अभिषेक शर्मानं ७७ धावांची खेळी केली आहे. अभिषेक शर्मानं सहज धवन याच्यासोबत शतकी भागीदारी केली. सहज धवन यानं १८ बॉलमध्ये ४५ धावा केल्या. अमृत सूरमास संघानं ५.१ ओव्हरमध्ये १०० धावा केल्या. रमनदीप सिंह याच्या नेतृत्त्वातील मोहाली किंग्जनं टॉस जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अमृतसर सूरमासचा कर्णधार अभिषेक शर्मानं सहज धवन याच्यासोबत संघाला स्फोटक सुरुवात करुन दिली. अभिषेक शर्मा आणि सहज धवन या दोघांनी पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. अभिषेक शर्मानं नमन धीर सोबत दुसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची भागीदारी केली. हरप्रीत ब्रारच्या गोलंदाजीवर नवव्या ओव्हरमध्ये अभिषेक शर्मा बाद झाला तेव्हा अमृतसरच्या १४२ धावा झाल्या होत्या. अभिषेक शर्मानं पॉवर प्लेच्या अखेरच्या बॉलवर चौकार मारत अर्धशतक पूर्ण केलं. त्यानं १७ बॉलमध्ये अर्धशतक पूर्ण केलं. आयुष गोयलनं टाकलेल्या पाचव्या ओव्हरमध्ये अभिषेक शर्मानं जोरदार षटकार मारले. अभिषेक शर्मानं संपूर्ण डावात ७ षटकार आणि ६ चौकार मारले. अभिषेक शर्मानं २६ बॉलमध्ये २९६ च्या स्ट्राइक रेटनं ७७ धावा केल्या. नमन धीर यानं देखील २२ बॉलमध्ये ५ षटकार आणि १ चौकाराच्या मदतीनं ४७ धावा केल्या.



आज आसेगाव, ता. जिंतूर येथील श्री साई मित्र मंडळाच्या वतीने आयोजित आसेगाव ते शिर्डी पायी दिंडीचे मंठा नगरीत आगमन झाले. यावेळी दिंडीचे मनःपूर्वक स्वागत करून श्री साईबाबांची शिवसेना तालुका प्रमुख उदय बोराडे यानीं आरती घेऊन आशीर्वाद घेतले. तसेच सर्व साईभक्तांशी मनमोकळा संवाद साधून त्यांच्या पुढील शिर्डी प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# स्वतंत्र मराठवाडा रेल्वे मंडळासाठी जालन्यात ६ सप्टेंबरला 'मराठवाडा रेल्वे परिषद'

## जालना रेल्वे संघर्ष समितीची नियोजन बैठक संपन्न; मराठवाड्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : महासचिव फेरोज अली यांचे आवाहन

जालना । प्रतिनिधी : स्वतंत्र 'मराठवाडा रेल्वे मंडळ' निर्माण करून ते मध्य रेल्वे झोनमध्ये समाविष्ट करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह मराठवाड्यातील विविध प्रलंबित रेल्वे प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी जालना रेल्वे संघर्ष समितीने पुढाकार घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी जालना येथे 'मराठवाडा रेल्वे परिषद' आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी जालना येथील सुयेशा लॉन्स येथे नियोजन बैठक संपन्न झाली. मराठवाड्यातील रेल्वे विकासाला गती मिळावी, रेल्वेच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघटित आवाज निर्माण व्हावा तसेच स्वतंत्र मराठवाडा रेल्वे मंडळाच्या मागणीसाठी केंद्र सरकारकडे प्रभावी पाठपुरावा व्हावा, या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या मराठवाडा रेल्वे परिषदेचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित राहणार आहेत. परिषदेसाठी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, परभणीचे खासदार संजय जाधव, बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह मराठवाड्यातील विविध लोकसभा मतदारसंघांचे खासदार तसेच जालना जिल्ह्यातील आजी-माजी आमदार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या अनेक मागण्या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. नव्या रेल्वे गाड्या, विविध महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना स्थानकांवर थांबे, रेल्वेमार्गांचे दुहेरीकरण व विद्युतीकरण, प्रवासी सुविधा आणि रेल्वेच्या प्रशासकीय व्यवस्थेत मराठवाड्याला स्वतंत्र स्थान मिळावे, यासह विविध प्रश्नांवर या परिषदेत चर्चा होण्याची अपेक्षा आहे.स्वतंत्र



मराठवाडा रेल्वे मंडळाची निर्मिती झाल्यास मराठवाड्यातील रेल्वे प्रश्न अधिक प्रभावीपणे मार्गी लागण्यास मदत होईल. त्यामुळे हा विषय केवळ जालना जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाशी संबंधित असल्याचे जालना रेल्वे संघर्ष समितीने स्पष्ट केले आहे. रेल्वेच्या प्रश्नांसाठी मराठवाड्यातील नागरिकांनी एकत्र येण्याची गरज असून, दि. ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मराठवाडा रेल्वे परिषदेला मराठवाड्यातील नागरिक, रेल्वे प्रवासी, व्यापारी, उद्योजक, सामाजिक संघटना आणि विविध क्षेत्रांतील पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जालना रेल्वे संघर्ष समितीचे महासचिव फेरोज अली यांनी केले आहे.

# टाकळीवाडीत गॅस वाहिनीला गळती; खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील वाहतूक वळवली


छत्रपती संभाजीनगर : गंगापूर तालुक्यातील टाकळीवाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली आहे. साखळी क्रमांक ४४७ ते ४७०, म्हणजेच हडस पिंपळगाव ते माळीवाडा दरम्यानची सुमारे ३० किलोमीटरची वाहतूक धुळे-सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे. आज सायंकाळी सुमारे ५ वाजता टाकळीवाडी येथे गॅस वाहिनीला गळती लागल्याचे निदर्शनास आले. घटनेची



माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या. गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले असून, अग्निशमन यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आली आहे. नागपूरकडून येणाऱ्या वाहनांसाठी मार्ग : नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून धुळे-सोलापूर महामार्गावर वळविण्यात येतील आणि हडस पिंपळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर प्रवेश करतील. खबरदारीच्या दृष्टीने वाहतूक दरम्यान, गेल कंपनीच्या तज्ज्ञांनी गॅस वाहिनीच्या दोन्ही बाजूंचे व्हॉल्व्ह बंद केले असून, पाइपलाइनमधील दाब कमी होत आहे. परिस्थिती नियंत्रणात आणून वाहतूक लवकरात लवकर सुरळीत करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. जिल्हाधिकारी तसेच पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. अधिक माहितीसाठी नागरिकांनी समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्षाच्या १८०० २३३ २२ ३३ किंवा ८१८१८१८१५५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे प्रशासनाने कळविले आहे.

# असंख्य भाविकांच्या योगदानातून साकारले पवित्र कार्य

नाशिक : श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावरील जगप्रसिद्ध श्री सप्तशृंगी देवी मंदिराच्या नवीन कलशारोहणाचा ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण सोहळा आज म्हणजेच रविवार (३० ऑगस्ट) रोजी दुपारी १२.३० वाजता श्रावण कृष्ण द्वितीया, आदित्य पूजन मुहूर्तावर विधिवत पार पडणार आहे. या मंगल सोहळ्याकडे महाराष्ट्रासह देशभरातील लाखो भाविकांचे लक्ष लागले आहे. श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या वतीने मंदिरावर नवीन कलशारोहण करण्याचा मंगल संकल्प हाती घेण्यात आला होता. या पवित्र कार्यासाठी हजारो भाविकांनी वस्तूरूपाने तसेच देणगीच्या माध्यमातून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भाविकांची श्रद्धा,



विश्वास आणि सहकार्य यांच्या बळावर हे ऐतिहासिक कार्य साकार झाले असून, त्यामुळे संपूर्ण सप्तशृंगगड परिसरात उत्सवाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. विवेक सोनुने यांच्या शुभहस्ते श्री सप्तशृंगी माता मंदिराच्या कलशाचे पूजन व कलशारोहण करण्यात येणार आहे. प. पू. महामंडलेश्वर स्वामी श्री संविदानंद सरस्वती (कैलास मठ, नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली कलश स्थापना विधी संपन्न होणार आहे. यावेळी विविध लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, आजी-माजी विश्वस्त, साधू-संत, पुरोहित, कर्मचारी, ग्रामस्थ, व्यापारी संघाचे सदस्य तसेच विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत मंदिराच्या कलशाचे विधिवत आरोहण करण्यात येणार आहे. या पवित्र कार्यासाठी योगदान देणारे सर्व दाते, सेवेकरी आणि भाविक यांच्याप्रती श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टने कृतज्ञता व्यक्त केली आहे. भाविकांच्या सामूहिक श्रद्धेतून साकारलेले हे कार्य सप्तशृंगगडाच्या धार्मिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. दरम्यान, सोहळ्यादरम्यान होणारी गर्दी लक्षात घेऊन कार्यक्रमस्थळी केवळ निमंत्रितांनाच प्रवेश देण्यात येणार आहे.

# कडक सुरक्षा आणि थेट प्रत्यक्ष देखरेखीत झाली नीट-पीजी परीक्षा

नवी दिल्ली : नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस (एनबीईएमएस) या राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळाने रविवार ३० ऑगस्ट २०२६ रोजी, कडक सुरक्षा, तांत्रिक सुविधा, मालवाहतूक व्यवस्थापन आणि पुरेशा मनुष्यबळाच्या व्यवस्थेसह देशभरात नीट-पीजी २०२६ परीक्षा यशस्वीरीत्या घेतली. परीक्षेची प्रक्रिया निःपक्ष, सुरक्षित आणि सुरळीत राहावी, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३३९ शहरांमधील ११११ परीक्षा केंद्रांवर २,७३,०९६ उमेदवारांसाठी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षेला एकूण २,६५,९८० उमेदवार उपस्थित राहिले. यापैकी सुमारे २,६३,५३५ उमेदवारांची परीक्षा निर्विघ्नपणे झाली.

देशभरातील परीक्षेवर प्रत्यक्ष थेट देखरेख आणि कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. परीक्षेच्या आयोजनावर देखरेख ठेवण्यासाठी एकूण २५२७ प्राध्यापकांची स्वतंत्र निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, अधिष्ठाते, संचालक, वैद्यकीय अधीक्षक आणि वरिष्ठ प्राध्यापकांसह ७०० हून अधिक जण भरारी पथकांचे सदस्य म्हणून तैनात करण्यात आले होते. समन्वय आणि




देखरेख अधिक प्रभावी करण्यासाठी देशभरात एनबीईएमएसची १६ प्रादेशिक नियंत्रण केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती. परीक्षा केंद्रांवर थेट सीसीटीव्हीची देखरेख ठेवण्यात आली होती. द्वारका येथील एनबीईएमएसच्या मुख्यालयातील कमांड सेंटरमधून या देखरेखीवर सतत लक्ष ठेवले जात होते. थेट तात्काळ देखरेखीसाठी एनबीईएमएस आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) च्या १९० कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तैनात करण्यात आले होते.

एनबीईएमएसच्या मुख्यालयातील विशेष नियंत्रण केंद्रातून एनबीईएमएस, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल), इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (ईसीआयएल) आणि टीसीएसच्या अधिकाऱ्यांनी दिवसभर परीक्षा प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवले. परीक्षेची सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि तोतयेगिरी रोखण्याच्या उपायांचा एक भाग म्हणून, परीक्षा केंद्रांवर उमेदवारांचे आधार-आधारित प्रमाणीकरण यशस्वीरीत्या झाले. सरकारी संस्थांनी परीक्षेच्या सुरक्षित आणि शिस्तबद्ध आयोजनासाठी पूर्ण सहकार्य केले.

देशभरातील बहुतांश उमेदवारांसाठी परीक्षा यशस्वीरीत्या पार झाली असली तरी, ळजछ डिजिटल झोन ळऊ्न सीतापुरा केंद्र, जयपूर, राजस्थान (टीसी क्र. ४१६८२ आणि ४१६८३) येथे एक अनपेक्षित तांत्रिक अडथळा निर्माण झाला. तिथे परीक्षा घेणाऱ्या टीसीएस लिमिटेड या संस्थेच्या परीक्षा केंद्रांमधील अंतर्गत वीज पुरवठ्यातील समस्यांमुळे २४४५ उमेदवारांची परीक्षा पूर्ण होऊ शकली नाही. उमेदवारांची अशाप्रकारे परीक्षेदरम्यान गैरसोय झाल्या बद्दल एनबीईएमएसने तीव्र खेद व्यक्त केला आहे. या उमेदवारांना इतरांप्रमाणेच नीट-पीजी २०२६ परीक्षा पुन्हा एकदा आणि निःपक्षपणे देता यावी, यासाठी एनबीईएमएसने तातडीने आवश्यक पावले उचलली आहेत. त्यानुसार, या तांत्रिक अडथळ्या मुळे परीक्षा देता न आलेल्या सर्व उमेदवारांची पुनर्परीक्षा शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जयपूर, राजस्थान येथे घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण आणि इतर आवश्यक सूचना संबंधित उमेदवारांना स्वतंत्रपणे कळवण्यात येतील.

पान १ वरुन

## युवकांच्या हातात

संदेश देत डॉ. पाटील यांनी व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. केवळ स्वतः व्यसनापासून दूर राहणे पुरेसे नसून मित्रपरिवार व समाजातील इतर व्यक्तींनाही व्यसनमुक्त करण्याची जबाबदारी युवकांनी स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात ध्येय निश्चिती व नियोजन, करिअर मार्गदर्शन व संधी, कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास, मानसिक आरोग्य व सकारात्मकता, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी या महत्त्वपूर्ण विषयांवर युवकांशी संवाद साधण्यात आला.

युवकांनी आपण देशासाठी आणि समाजासाठी जगले पाहिजे, असा संकल्प करत सकारात्मक परिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा व सत्काराचा सोहळा न करता युवकांच्या भवितव्याला दिशा देणारा 'युवा संवाद' हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल डॉ. रामेश्वर पाटील व युवा मित्र मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमास रोशनगाव परिसरातील युवक, नागरिक तसेच युवा मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## मोफत शिक्षण, स्पर्धा परीक्षा

सकारात्मक निर्णय घ्यावा. शासनाकडून ठोस निर्णय मिळत नाही, तोपर्यंत आपण आंदोलनाच्या ठिकाणाहून उठणार नाही, असा स्पष्ट इशाराही आंदोलकांनी दिला.

या उपोषणाला ब्राह्मण समाज बांधवांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. शासन या विविध मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि आंदोलकांच्या उपोषणाची दखल घेत ठोस निर्णय कधी घेतला जातो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

## 'रील स्टार'चा धुमाकूळ!

चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमातही अशाच प्रकारचे चित्र पाहायला मिळाले. पत्रकारांपेक्षा रिल्स स्टार ची गर्दी अधिक जाणवत होती. कार्यक्रमाचे छायाचित्रण करताना पत्रकारांना अक्षरशः धक्का-बुक्कीचा सामना करावा लागल्याचेही दिसून आले. जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस मुख्यालय, झेंडावंदन किंवा महत्त्वाच्या शासकीय बैठका असोत-काही ठिकाणी नेत्यांच्या जवळचे रीलिस्ट मोबाईल घेऊन पुढे उभे राहतात. त्यामुळे मागे असलेल्या पत्रकारांना कव्हरेज करण्यासाठी जागाच उरत नाही.

पत्रकारांचे काम नेत्यांची प्रसिद्धी करणे नसून शासकीय योजना, विकासकामे आणि महत्त्वाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे हे आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी आपल्या प्रसिद्धीसाठी रील बनवणाऱ्या प्रतिनिधींना कार्यक्रमस्थळी योग्य शिस्त पाळण्यास सांगणे गरजेचे आहे. शासकीय कार्यक्रमांमध्ये अधिकृत पत्रकारांसाठी स्वतंत्र जागा आणि योग्य नियोजन केले जाणार का? असा सवाल आता पत्रकारांकडून उपस्थित होत आहे. शेवटी प्रश्न एवढाच-हा शासकीय कार्यक्रम आहे की राजकीय 'रील्स'च्या शूटिंगचा सेट? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पान १ वरुन

## पंतप्रधान मोदी

घोषणा, गाणी आणि नाटकांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीसाठी जनजागृती करण्याचे आवाहन केले आहे. स्वातंत्र्य दिन, राष्ट्रीय हातमाग दिन आणि भारत छोडो आंदोलनाचा वर्धापन दिन यांसारखे प्रसंग देशवासियांमध्ये अभिमानाची भावना जागृत करतात, असे सांगत पंतप्रधान मोदींनी वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनाचाही उल्लेख केला आणि सांगितले की, वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनामुळे हे वर्ष अधिकच विशेष झाले आहे. त्यांनी सांगितले की, 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत आतापर्यंत ८ कोटींहून अधिक तिरंगा सेल्फी अपलोड करण्यात आले आहेत. त्यांनी सूर्यपथ तिरंगा अभियानाचाही उल्लेख केला.

पीएम स्वनिधी योजनेचा उल्लेख करत पंतप्रधानांनी या योजनेने महिलांना कसे सक्षम केले आहे हे सांगितले. पीएम स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांपैकी ४६ टक्के महिला आहेत. त्यांनी गाझियाबादच्या बबिता शर्मा यांचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, त्या पूजेचे साहित्य विकायच्या, पण पीएम स्वनिधी योजनेमुळे त्यांना मदत मिळाली आणि आता त्यांच्या स्टॉलचे दुकानात रूपांतर झाले आहे.

पंतप्रधानांनी अमरनाथ यात्रेदरम्यान स्वच्छता आणि सार्वजनिक सहभागाबद्दल भाष्य केले. त्यांनी प्रसिद्ध अभिनेते उत्तम कुमार यांच्या जन्मशताब्दीचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, उत्तम कुमार यांनी आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आणि लोकांच्या मनात आपले स्थान कायमचे कोरले आहे. सणांचा उल्लेख करत पंतप्रधानांनी 'व्होकल फॉर लोकल'चा अवलंब करण्याचे पुन्हा एकदा आवाहन केले. त्यांनी कंटेंट क्रिएटर्स आणि इन्फ्लुएन्सर्सना 'व्होकल फॉर लोकल'ला चा अवलंब करण्याचे पुन्हा एकदा आवाहन केले. त्यांनी कंटेंट क्रिएटर्स आणि इन्फ्लुएन्सर्सना 'व्होकल फॉर लोकल'ला प्रोत्साहन देण्याचे आणि इतरांनाही असे करण्याचे आवाहन केले.

# जालना शहरात गणरायाच्या आगमनाची लगबग; मूर्तिकारांकडून मूर्तींना अंतिम रूप







जालना/प्रतिनिधी : गणपती बाप्पाच्या आगमनाला अवघे १४ दिवस शिल्लक राहिल्याने शहरातील गणेशमूर्ती कारखाने व मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये लगबग वाढली आहे. गणेशोत्सवासाठी विविध आकर्षक व नाविन्यपूर्ण गणेशमूर्ती तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, मूर्तिकार मूर्तींवर शेवटचा हात फिरवताना दिसत आहेत. यंदा पारंपरिक गणेशमूर्तींसोबतच विविध संकल्पनांवर आधारित आकर्षक मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत. सेल्फी काढणारा गणपती, मोटारीमध्ये विराजमान झालेला गणपती तसेच विविध कलात्मक रूपातील गणेशमूर्ती उपलब्ध झाल्या. त्यामुळे भाविकांमध्येही या आकर्षक मूर्तींबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी मूर्तिकार दिवसरात्र मेहनत घेत असून, लवकरच या मूर्ती गणेशभक्तांच्या घरी व मंडळांमध्ये विराजमान होणार आहेत.

**छायाचित्र : किरण खानापुरे**

## उपवर्गीकरण समनार्थ मातंग समाजाचा आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



जालना । प्रतिनिधी : अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण 'अ, ब, क, ड' या पद्धतीने करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी समस्त मातंग समाजाच्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबतची माहिती मातंग समाजाचे नेते अशोक साबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात होणार आहे. गांधी चमन येथून मोर्चा निघून शनी मंदिर, उड्डाणपूल, नूतन वसाहत मार्गे अंबड चौफुली येथे पोहोचणार असून, तेथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या जाहीर सभेसाठी मातंग समाजाचे प्रमुख नेते व पदाधिकारी, अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, अमित बोडके, विष्णू कसबे, कुमार कांबळे, आदित्य चांदणे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

या मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळणार असून सुमारे १० ते १५ हजार समाजबांधव सहभागी होतील, असा दावा अशोक साबळे यांनी पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार परिषदेला मातंग समाजाचे नेते कृष्णा पांडव, रविकांत जगधने, विष्णू गवळी, सचिन क्षीरसागर, संजय गायकवाड, किरण शिरसाट, सर्जेराव जाधव, अंकुश राजगिरे, चंद्रकांत कारके, ललित कुचेकर, विठ्ठल तुपसौदर, चतुसिंग गोफणे, संतोष तुपसौदर, मुक्ताराम सोनवणे, राम सुतार, रवी पांडव, संतोष निकाळजे, रवी पाखरे, अरविंद शिरगुळे, सुरेश कांबळे, किशोर कांबळे, कुंडलिक कसबे, रंजीत शेजुळ, कारभारी जाधव, सुरेश घोरपडे, राहुल कारके, गणेश लोढे आदी उपस्थित होते. प्रमुख मागणी अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण 'अ, ब, क, ड' पद्धतीने करून मातंग समाजाला न्याय्य प्रतिनिधित्व व आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

# धर्म जागरण, संस्कार निर्मिती आणि हिंदू एकतेचा संकल्प; विविध समित्या गठीत



भागवत कथेच्या नियोजनासाठी सकल हिंदू समाजाची संयुक्त बैठक संपन्न

जालना/प्रतिनिधी : भक्ती ज्ञान गंगा श्रीमद्भागवत कथा समितीच्यावतीने २० ते २६ सप्टेंबर या कालावधीत जालन्यातील मंठा रोडवरील आई साहेब लॉनमध्ये आयोजित करण्यात प. पू. श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या श्रीमद्भागवत कथेच्या पूर्वतयारी व यशस्वी नियोजनासाठी रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी वाजता महेश भवन येथे सकल हिंदू समाजाची एक भव्य व ऐतिहासिक संयुक्त बैठक उत्साहात संपन्न झाली. त्यात विविध समाजांनी सेवांची जबाबदारी स्वीकारत धर्म जागरण, संस्कार निर्मिती आणि हिंदू एकतेचा संकल्प केला.

या बैठकीत मराठा समाज, अग्रवाल समाज, माहेश्वरी समाज, दायमा समाज, ब्राह्मण समाज, सिंधी समाज, गुजराती समाज, माळी समाज, बौद्ध समाज, जैन समाज, श्रीमाळी समाज, वारकरी समाज, राजपूत समाज, गौड समाज, तेली समाज, विप्र समाज तसेच अहिर-गवळी समाजासह जालन्यातील विविध सामाजिक व धार्मिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवला.

या बैठकीस आर.पी. रोडवरील राम मंदिराचे प. पू. मनोज महाराज गौड आणि जुना जालना राम मंदिराचे प. पू. रामदासी महाराज प्रमुख अतिथी व आशीर्वचनकर्ते म्हणून उपस्थित होते. आपल्या आशीर्वचनात दोन्ही संतांनी हिंदू समाजाच्या एकतेवर भर देत सांगितले की, ही कथा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून संपूर्ण हिंदू समाजाला एका सूत्रात बांधण्याची एक दिव्य संधी आहे. सर्व समाजाने जात, पंथ आणि संघटनांच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊन एक हिंदू म्हणून या महायज्ञात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आपण आधी हिंदू आहोत, नंतर समाज-अभय कुलकर्णी : प्रास्ताविकात अभय कुलकर्णी म्हणाले की, प्रत्येक समाजाची स्वतःची सामाजिक ओळख, परंपरा आणि संघटना असते आणि त्याचा सार्थ अभिमान सर्वांना असावा. परंतु, जेव्हा हिंदू समाजाच्या एकतेचा प्रश्न येतो, तेव्हा या सर्व मर्यादा ओलांडून एकत्र येणे काळाची गरज आहे. आपण आधी हिंदू आहोत, त्यानंतर आपापल्या समाजाचे घटक आहोत. ही कथा कोणत्याही एका समाजाची किंवा संस्थेची नसून संपूर्ण जालना हिंदू समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या आयोजनात कोणालाही पैशांची विचारणा केली जाणार नसून, तुम्ही कोणती सेवा सांभाळणार? हे विचारले जाईल. त्यांनी पादत्राणे व्यवस्था, पेयजल, प्रसाद वितरण, वाहनतळ (पार्किंग), स्वच्छता, स्वयंसेवक व्यवस्था, वैद्यकीय समन्वय, प्रचार-प्रसार, महिला सेवा, ज्येष्ठ नागरिक सेवा आणि युवा सेवा अशा विविध जबाबदाऱ्या स्वीकारण्याचे आवाहन सर्व समाजांना केले. या आयोजनाची खरी जबाबदारी येणाऱ्या पिढीला घडवण्याची आहे. संपूर्ण कुटुंबाने (मुलं, तरुण, पालक आणि ज्येष्ठ नागरिक) या कथेत सहभागी व्हावे. कुटुंब मजबूत झाले तर समाज मजबूत होईल आणि समाज मजबूत झाला तर राष्ट्र बलशाली होईल. तरुणांनी केवळ प्रेक्षक न राहता सेवा आणि नेतृत्वाची धुरा हाती घ्यावी.

धर्म जागरण व हिंदू एकतेचा✲ ✲महायज्ञ-विष्णुकुमार चेचानी : कथेचा मुख्य संकल्प आणि उद्देश विशद करताना मुख्य यजमान विष्णुकुमार चेचानी म्हणाले की, २०१७ नंतर प.पू. श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या कथेचा योग जालन्याला मिळणे हे अत्यंत भाग्याचे आहे. ही कथा म्हणजे केवळ भागवत श्रवण नसून धर्म जागरण, संस्कार निर्मिती, हिंदू एकता, सामाजिक समरसता आणि राष्ट्र चेतनेचा महायज्ञ आहे. आज जालन्यात साधनांची कमतरता नाही, गरज आहे ती समाजाच्या एकतेची, सहभागाची आणि समर्पणाची, असे ते म्हणाले.

या प्रसंगी मुख्य यजमान श्री. चेचानी यांनी सप्तदिवसीय दैनिक कथा यजमान म्हणून घनश्यामदास गोयल,अरुण अग्रवाल, समीर अग्रवाल, सीए नितीन तोतला, कैलाश लोया,शिवरतन मुंदडा, राजेश सोनी, श्रीकृष्ण जन्मोत्सव यजमान म्हणून विजयजी बद्रीनारायण राठी, ५६ भोग यजमान म्हणून अशोक झंवर,रुक्मिणी विवाह यजमान म्हणून रामनिवास मानधानी यांच्या नावाची घोषणा केली. उमेश बजाज यांनी कथेच्या विविध सेवा विभागांची आणि व्यवस्थांची सविस्तर माहिती दिली. यानंतर सर्व समाज प्रतिनिधींनी आपापल्या वतीने पूर्ण सहकार्य व सक्रिय सहभागाचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले तर शेवटी उपस्थित सर्व संत-महंत, समाज प्रतिनिधी, पाहुणे आणि कार्यकर्त्यांचे आभार रामजी उपाध्याय यांनी मानले. या बैठकीत सर्वानुमते असा निर्धार करण्यात आला की, ही श्रीमद्भागवत कथा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता हिंदू एकता, सामाजिक समरसता, राष्ट्रभक्ती आणि सनातन संस्कृतीच्या जागरणाचा एक विराट उत्सव ठरेल.

## पंतप्रधान मोदी १३७ व्या 'मन की बात'मधून कोणत्या विषयांवर काय बोलले ?



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ३० ऑगस्ट २०२६ रोजी १३७ व्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशाला संबोधित केले. मोदी विदेश दौऱ्यावर असल्यामुळे यावेळी कार्यक्रम आधीच ध्वनीमुद्रीत (प्री रेकॉर्डेड प्रोग्रॅम) केला होता. यंदाच्या 'मन की बात' कार्यक्रमातून मोदींनी व्यसनमुक्ती मोहिमेसह सामाजिक आणि राष्ट्रीय विषयांवर भाष्य केले. त्यांनी 'भारत छोडो' आंदोलनासह स्वातंत्र्य लढ्याचाही उल्लेख केला. कार्यक्रमात बोलताना पंतप्रधानांनी मुंबईचे कृष्णा शेषाद्री चालवत असलेल्या 'भारतराज्य.कॉम' या वेबसाइटचा उल्लेख केला. या वेबसाइटवर तुम्ही कोणतेही वर्ष निवडून त्या वेळी भारताच्या कोणत्या भागावर कोणाचे राज्य होते, हे पाहू शकता. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदींनी कृष्णा शेषाद्री यांच्याशी फोनवर संवादही साधला. तसेच पंतप्रधानांनी त्यांना ही कल्पना कुठून सुचली, असेही विचारले. पंतप्रधानांनी कृष्णा शेषाद्री यांचे कौतुक केले. व्यसनमुक्ती मोहिमेचाही पंतप्रधानांनी भाषणात उल्लेख केला. देशातील तरुण व्यसनमुक्ती मोहिमेचा भाग बनत आहेत. ही चांगली बाब असल्याचे मोदी म्हणाले. अमली पदार्थांच्या व्यसनाचा परिणाम केवळ व्यक्तीवरच नाही, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे व्यसनाच्या विळख्यातून देशातील तरुण पिढी बाहेर पडणे आवश्यक असल्याचे पंतप्रधान म्हणाले. त्यांनी तरुणांना (पान ३ वर)

# 'रील स्टार'चा धुमाकूळ! पत्रकारांना मागे सारून नेत्यांच्या मर्जीतील रीलस्टांना पुढे जाण्याची मुभा?

## शासकीय कार्यक्रम की राजकीय रील्सचा सेट? नेत्यांच्या प्रसिद्धीसाठी मोबाईलधारींची गर्दी; अधिकृत पत्रकारांना कव्हरेज करताना अडचणी

जालना/प्रतिनिधी : दिनांक २९ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना : सोशल मीडियाच्या युगात रील बनवण्याची क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. राजकीय नेत्यांच्या भेटीगाठींपासून ते विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन आणि शासकीय कार्यक्रमांपर्यंत प्रत्येक ठिकाणी मोबाईल हातात घेतलेले 'रील स्टार' पुढे-पुढे करताना दिसत आहेत. मात्र, या वाढत्या हस्तक्षेपाचा फटका आता अधिकृत पत्रकारांना बसताना दिसत आहे.

खासदार, आमदार, महापौर, उपमहापौर, नगरसेवक आणि विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यक्रमांमध्ये काही सोशल मीडिया प्रतिनिधी नेत्यांच्या अगदी जवळ राहून रील्स आणि व्हिडिओ शूट करण्यात मग्न असतात. नेत्यांच्या प्रसिद्धीसाठी हे रील्स सोशल मीडियावर झटपट व्हायरल केले जातात. मात्र, त्याचवेळी पत्रकारांना कार्यक्रमाचे फोटो आणि व्हिडिओ घेण्यासाठी जागा मिळत नसल्याचे चित्र अनेकदा पाहायला मिळते. अनेक राजकीय पुढाऱ्यांचे



स्वतःचे 'रील स्टार' प्रतिनिधी असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. नेत्यांच्या प्रत्येक भेटीगाठी, कार्यक्रम आणि हालचालींचे रील्स तयार करून ते सोशल मीडियावर अपलोड करण्यासाठी या प्रतिनिधींची अक्षरशः धडपड सुरू असते. मात्र, या रील्सच्या गर्दीचा थेट फटका अधिकृत माध्यम प्रतिनिधींना बसत असून, कार्यक्रमाचे योग्य पद्धतीने कव्हरेज करताना पत्रकारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, राजकीय नेत्यांनी रील्स आणि सोशल मीडिया प्रसिद्धीच्या मागे धावण्यापेक्षा विकासकामे, जनतेचे मूलभूत प्रश्न, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि सर्वसामान्यांच्या समस्यांकडे अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आता नागरिकांमधून व्यक्त होत आहे. रील्समधील प्रसिद्धी काही क्षणांची असते; मात्र विकासकामांची छाप जनतेच्या मनात कायम राहते, अशी चर्चाही सध्या नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या (पान ३ वर)

## मंडोदरी शामराव ढवळे यांचे वृद्धापकाळाने निधन



परतूर (वा.) : नूतन परतूर केंद्राचे केंद्रप्रमुख विष्णू ढवळे यांच्या मातोश्री मंडोदरी शामराव ढवळे (वय ९० वर्षे) यांचे आज सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

मुलगी, यांच्यासह सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने ढवळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातील शिक्षण क्षेत्र व नातेवाईकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी २:३० वाजता परतूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बदनापूरमध्ये ३१ ऑगस्ट रोजी भव्य कावड यात्रेचे आयोजन

## कावड यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आयोजकांचे आवाहन

बदनापूर । प्रतिनिधी (नवनाथ गव्हाणे) : बदनापूर शहरात श्रावण महिन्यानिमित्त सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे ७ वाजता भव्य व पवित्र कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कावड यात्रा सावता महाराज मंदिर येथून प्रारंभ होणार असून शहरातील प्रमुख मार्गांवरून भक्तिमय वातावरणात मिरवणूक काढण्यात येणार आहे.

यात्रेचा मार्ग सावता महाराज मंदिर, बालाजी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गणपती मंदिर, कैलास नगर, गणेश नगर, पवार गल्ली, छत्रपती संभाजी चौक, संत रोहिदास नगर मार्गे गावाबाहेरील मारोती मंदिरापर्यंत असा निश्चित करण्यात आला आहे. यात्रेत भगवान शंकराच्या जयघोषात शेकडो भाविक सहभागी होणार असून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

कावड यात्रेच्या निमित्ताने सर्व बदनापूरकरांनी मोठ्या संख्येने यात्रेत सहभागी व्हावे, तसेच मिरवणूक मार्गावर आपल्या घरासमोर रांगोळी काढून, फुलांची सजावट करून आणि भाविकांसाठी जलपानाची व्यवस्था करून यात्रेचे स्वागत करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. श्रावणातील या पवित्र कावड यात्रेमुळे बदनापूर शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण होणार असून नागरिकांनी भक्तिभावाने या सोहळ्यात सहभागी व्हावे, असेही आयोजकांनी म्हटले आहे.

# स्वप्नांना दिशा देणारा संवाद; विद्यार्थ्यांच्या मनात करिअरची नवी पहाट

दिंडोरी प्रतिनिधी : प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात भविष्यातील यशाचे एक सुंदर स्वप्न असते; मात्र त्या स्वप्नाला योग्य दिशा, ध्येयाला योग्य मार्ग आणि प्रयत्नांना सातत्याची जोड मिळाली, तरच ते स्वप्न वास्तवात उतरते. याच भावनेतून रामशेज माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, दिंडोरी तालुक्यातीलआशेवाडी येथे आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक वैभव सांगळे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या भविष्यातील वाटचालीला नवी दिशा दिली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे कुतूहल आणि मनातले असंख्य प्रश्न जाणून घेत पोलीस उपनिरीक्षक वैभव सांगळे यांनी करिअर निवडीबाबत मार्गदर्शन केले. करिअर निवडताना इतरांचे अनुकरण करण्यापेक्षा स्वतःची आवड, क्षमता आणि ध्येय ओळखा. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो; अभ्यास, शिस्त आणि सातत्यपूर्ण



मेहनत हाच त्याचा खरा मार्ग आहे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेत उपलब्ध असलेल्या विविध संधी, त्यासाठी आवश्यक असलेली तयारी, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन तसेच आत्मविश्वासाचे महत्त्व त्यांनी सोप्या आणि ओघवत्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांच्या संवादातून विद्यार्थ्यांना केवळ करिअरच्या संधींची माहिती मिळाली नाही, तर 'आपणही काहीतरी मोठे करू शकतो' हा आत्मविश्वासही मिळाला. यावेळी रामशेज, आशेवाडीच्या पोलीस पाटील सौ. सुनिता विलास बोडके यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिला सुरक्षा आणि महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, शिक्षकवृंद, कर्मचारी, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

करिअरच्या वाटेवर नेमके कोणते पाऊल टाकायचे, कोणते क्षेत्र निवडायचे आणि ध्येय गाठण्यासाठी कशी तयारी करायची, याचा विचार करण्याची प्रेरणा या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाली. स्वप्न मोठे असावे, ध्येय स्पष्ट असावे आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची दिशा योग्य असावी, हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनावर उमटवत करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि उज्ज्वल भवितव्यासाठी रामशेज माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थ व पालकांकडूनही कौतुक करण्यात आले.